G.Drive Backup:\RM Correspondance /Genral Correspondance Letter (Repaired)


**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
Aurangabad – 431 004, Maharashtra, India
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)


संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ २०२२-२३/ 10300-302 दिनांक:- १२-०९-२०२२.

**प्रति,**
**प्राचार्य / संचालक,**
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर माराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.

**विषय:-** **संलग्नीकरणाचे नुतणीकरण व विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, तुकडीवाढ विद्याशाखावाढ व सॅटेलाईट केंद्र इत्यादी बाबीसाठी विद्यापीठास विहित मुदतीच्या आत प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**संदर्भ:-** १) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९अन्वये करण्यात आलेली तरतुद.
२) सॅटेलाईट केंद्रा संदर्भात शासन निर्णय दिनांक १८-०९-२०२०.

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी विस्तारीकरणाअंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, विद्याशाखावाढ, तुकडीवाढ व सॅटेलाईट केंद्र करिता दि. ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत नियमामध्ये विहित केलेल्या प्रारुप / नमुन्यामध्ये ऑनलाईनद्वारे अध्यादेश-१५०, १५१, १५२ व १५२A अन्वये विहित केलेल्या शुल्काचा ऑनलाईनद्वारे भरणा करुन विहित नमुन्यातील तसेच संलग्नीकरणाचे नुतणीकरण सुध्दा नियमामध्ये विहित केल्यानुसार विहित शुल्कासह विहित नमुन्यामध्ये दि. ३० सप्टेंबर, २०२२ पर्यंत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे विद्यापीठास अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी संलग्नीकरणाचे नुतणीकरण बाबत विहित नमुन्यातील अर्ज व विहित शुल्काचे चलन व पुरक दस्ताऐवजासह दि. ०५ ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत हार्डकॉपी विद्यापीठ कार्यालयाचे शैक्षणिक विभागास सादर करणे आवश्यक आहे, तसेच विस्तारीकरणा अंतर्गत विषयवाढ, अभ्यासक्रमवाढ, विद्याशाखावाढ, तुकडीवाढ व सॅटेलाईट केंद्र प्रस्ताव दि. ०५ ऑक्टोंबर, २०२२ पर्यंत ०४ प्रती हार्डकॉपी कार्यालयात सादर करण्यात यावी. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या दिनांकानंतर कोणतेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घेण्यात यावी, ही विनंती.

उपकुलसचिव,
(शैक्षणिक विभाग)

**प्रतिलिपी :-**

१. या पत्राची एक प्रत संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवून सुचित करण्यात येते की, विस्तारीकरणा अंतर्गत येणारे प्रस्ताव व संलग्नीकरणाचे नुतणीरकणाबाबत संबंधित महाविद्यालयांसाठी विहित असलेल्या प्रक्रियेप्रमाणे वेबसाईट तात्काळ सुरु करण्यात यावी.
२. मा. वित्त व लेखाधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.

sd/-
**उपकुलसचिव,**
(शैक्षणिक विभाग)